# 23. केंद्रशासित प्रदेश
## भाग VIII - कलम 239 ते 241

- केंद्रशासनाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाने प्रशासनाखाली असलेल्या प्रदेशांना केंद्रशासित प्रदेश असे म्हणतात. केंद्रशासित प्रदेशाचे अस्तित्व भारताच्या संघराज्या विरुद्ध आहे कारण केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यातील संबंध पूर्णपणे एकात्म स्वरुपाचे आहेत.

केंद्रशासित प्रदेशाची उत्क्रांती -

- **1874 -** लॉर्ड नॉर्थब्रुक यांनी काही अनुसूचित जिल्हे तयार केले नंतर त्यांनाच चीफ कमिशनरचे प्रांत म्हणतात.
- **1950 - C** आणि D विभागाचे राज्य निर्माण झाली.
- **1956 -** च्या 7 व्या घटनादुरुस्तीनुसार 6 केंद्रशासित प्रदेश निर्माण झाले. अंदमान निकोबार, दिल्ली, लॅकडिव्ह मिनीकाय अमिनदिवी बेटे, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा.
- **केंद्रशासित प्रदेशाच्या निर्मितीची कारणे -**

1) **सांस्कृतिक भिन्नता** - दमन दिव, गोवा, दादरा नगर हवेली, पुदुचेरी
2) **राजकीय व प्रशासकीय** - दिल्ली, चंदीगड
3) **संरक्षणात्मक महत्त्व** - अंदमान निकोबार, लक्षद्विप
4) **मागासलेपण व आदिवासी जनतेची काळजी -** अरुणाचलप्रदेश, त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम

- **भारतातील सध्याचे केंद्रशासित प्रदेश (8) -**

| क्र. | केंद्रशासित प्रदेश | स्थापना | राजधानी |
|---|---|---|---|
| 1. | दिल्ली | 1 नोव्हेंबर, 1956 | दिल्ली |
| 2. | अंदमान निकोबार | 1 नोव्हेंबर, 1956 | पोर्ट ब्लेअर |
| 3. | लक्षद्वीप | 1 नोव्हेंबर, 1956 | कवरती |
| 4. | दादरा नगर हवेली<br>दिव दमण | 1961 (एकत्रित 26<br>1962 (जानेवारी 2020) | सिल्वासा<br>दमण |
| 5. | पुदुचेरी | 16 ऑगस्ट, 1962 | पुदुचेरी |
| 6. | चंदीगढ | 1 नोव्हेंबर, 1966 | चंदीगढ |
| 7. | जम्मू-काश्मीर | 31 ऑक्टोबर, 2019 | श्रीनगर (उन्हाळी)<br>जम्मू (हिवाळी) |
| 8. | लडाख | 31 ऑक्टोबर, 2019 | लेह कारगील |

- **कलम 239 -** राष्ट्रपती मार्फत केंद्रशासित प्रदेशातील नायब राज्यपाल व प्रशासकाची नियुक्ती.

**नायब राज्यपाल -** दिल्ली, पाँडेचेरी, अंदमान निकोबार, जम्मू-काश्मीर, लडाख.

- **प्रशासक -** लक्षद्विप, चंदीगढ, दादरा नगर हवेली, दमण दीव
- **कलम 239(A) -** संसद कायद्याद्वारे पुदुचेरीसाठी विधानसभा व मंत्रिमंडळ दोन्हीही निर्माण करेल.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **कलम 239(B) -** विधानसभेच्या विरामकाळात नायब राज्यपालांना अध्यादेश काढण्याचा अधिकार असेल. (राष्ट्रपतीच्या सुचनेनुसार)
- **कलम 239(AA) -** दिल्लीचे नामकरण दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र असे असेल.
- **कलम 239(AB) -** राष्ट्रीय राजधानी दिल्लीचे प्रशासन 239(AA) नुसार चालवणे अशक्य झाल्यास आणि नायब राज्यपालांनी तशी शिफारस केल्यास राष्ट्रपती राष्ट्रपती राजवट लागू करतील.
- **कलम 240 -** राष्ट्रपती केंद्रशासित प्रदेशासाठी काही कायदेविषयक विनियमने लागू करतील.
- **कलम 241 -** केंद्रशासित प्रदेशासाठी संसद कायदा करुन उच्च न्यायालयाची स्थापना करेल किंवा एखादा केंद्रशासित प्रदेश दुसऱ्या उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट करेल.

**केंद्रशासित प्रदेश आणि उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र -**

| | | |
|---|---|---|
| दिल्ली | - | दिल्ली |
| जम्मू-काश्मीर | - | जम्मू-काश्मीर |
| दिव व दमण, दादरा नगरहवेली | - | बॉम्बे |
| अंदमान निकोबार | - | कलकत्ता |
| लक्षद्वीप | - | अर्नाकुलम |
| चंदीगढ | - | पंजाब व हरियाणा |
| पद्दुचेरी | - | मद्रास/चेन्नई |
| लडाख | - | जम्मू-काश्मीर |

- दिल्ली व जम्मू-काश्मीर हे स्वतः चे उच्च न्यायालय असणारे केंद्रशासित प्रदेश आहेत.